**ठळक बातम्या**

- संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला उद्यापासून सुरुवात
- वादग्रस्त न्यायमूर्ती वर्मांवर महाभियोग चालवण्याच्या प्रस्तावाला सर्व पक्षांची संमती मिळवण्याचा प्रयत्न असल्याचं संसदीय कार्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- इंधन तेल खाणींचा शोध घेण्यासाठी १० लाख चौरस किलोमीटर समुद्री क्षेत्र खुलं केल्याची पेट्रोलियम मंत्र्यांनी दिली माहिती

**आणि**

- मलेरिया प्रतिबंधक लस संशोधन प्रगतीपथावर

**<><><><><>**

संसदेचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होणार असून ते २१ ऑगस्टपर्यंत चालेल. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने नवी दिल्लीत संसद भवन इथं आज सर्वपक्षीय बैठक बोलावली होती.

ऑपरेशन सिंदूरबाबत संसदेत बोलण्यासाठी सरकार तयार असून भारत आणि पाकिस्तान यांच्यात मध्यस्थी केल्याच्या डोनाल्ड ट्रम्प यांच्या दाव्याबाबतही सरकार सभागृहात योग्य उत्तर देईल, असं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बैठकीनंतर वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

सर्वपक्षीय बैठकीत सर्व पक्षाच्या नेत्यांनी आपापल्या भूमिका तसंच अधिवेशनात मांडू इच्छिणाऱ्या मुद्द्यांची चर्चा केली असं ते म्हणाले. दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सहकार्य करण्याची विनंती विरोधी पक्षांना सरकारने केली आहे, सत्ताधारी आणि विरोधकांनी एकमेकांशी समन्वय साधून काम करावं अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. अधिवेशनात नियम आणि परंपरेचं पालन करत सर्व विषयांवर चर्चा होईल, असं रिजिजू यांनी स्पष्ट केलं.

**- होल्ड - बाईट - किरेन रिजिजू - - ( १९ सेकंद)**

अधिवेशनात प्रधानमंत्र्यांनी संसदेत महत्त्वाच्या विषयांवर निवेदन द्यावं अशी मागणी काँग्रेसने या बैठकीत केल्याचं गौरव गोगोई यांनी बैठकीनंतर वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. ऑपरेशन सिंदूर दरम्यान ५ विमानं पाडली गेल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. त्यावर आणि पहलगाममधल्या सुरक्षेतल्या त्रुटीवर बोलावं, अशी मागणी काँग्रेस आणि आरएसपीने सरकारला केली आहे. तसंच अहमदाबाद विमान दुर्घटना, दिल्लीच्या मद्रासी कँपमधे बुलडोझर इत्यादी बाबींवर सरकारनं स्पष्टीकरण द्यावं असं खासदार संजय सिंह म्हणाले. तर बिजेडीचे खासदार सस्मित पात्रा यांनी ओदिशात कायदा सुव्यवस्था कोलमडल्याचा आरोप बैठकीत केला.

या बैठकीला केंद्रीय मंत्री आणि राज्यसभेतले नेते जे पी नड्डा, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल आणि डॉ एल मुरूगन उपस्थित होते. याशिवाय, काँग्रेसचे गौरव गोगोई, प्रमोद तिवारी, समाजवादी पक्षाचे रामगोपाल यादव, द्रमुकचे तिरुची सिवा आणि टी आर बालु, आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या  सुप्रिया सुळे उपस्थित होत्या.

या अधिवेशनात दोन्ही सभागृहांच्या २१ बैठका होतील. या अधिवेशनात जनविश्वास सुधारणा विधेयक २०२५, राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक २०२५ सभागृहात चर्चेला येण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या २५ जुलैपासून दोन दिवसांच्या मालदीव दौऱ्यावर जाणार आहेत. या भेटीदरम्यान ते मालदीवमधल्या अनेक विकास प्रकल्पांचं उद्घाटन करतील. या भेटीत प्रधानमंत्री आणि मालदीवचे राष्ट्रपती मुइझ्झू यांच्यात महत्त्वाच्या द्विपक्षीय आणि प्रादेशिक मुद्द्यांवर उच्चस्तरीय चर्चा होईल.

त्यानंतर अनेक संयुक्त प्रकल्पांचं उद्घाटन केलं जाईल. याशिवाय दोन्ही देशांमध्ये विविध क्षेत्रांमधलं परस्पर सहकार्य वाढवण्याच्या उद्देशानं अनेक सामंजस्य करारही केले जाणार आहेत.

<><><><><>

पर्यटन, युवा सक्षमीकरण, महिलांचे स्वयंसहाय्यता गट, पीएम सूर्यघर योजना आणि व्हायब्रण्ट व्हिलेज योजना या सारख्या उपक्रमांमुळे मेघालयात घडून आलेल्या परिवर्तनाबद्दल प्रधानमंत्री मोदी यांनी एक लेख समाजमाध्यमावर सामायिक केला आहे. शासकीय मदत आणि स्थानिक जनतेच्या सहभागामुळे मेघालय आपल्या उदाहरणातून सक्षम आणि आत्मनिर्भर भारताचा मार्ग दाखवत आहे, असं मोदी यांनी समाजमाध्यमांवर म्हटलं आहे.

<><><><><>

हिमाचल प्रदेशात वारंवार येणाऱ्या नैसर्गिक आपत्तींचा  प्रभावीपणे सामना करण्यासाठी एक केंद्रीय समिती स्थापन करण्याचे निर्देश केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिले आहेत. गृहमंत्रालयाच्या पत्रकात ही माहिती दिली आहे. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रुडकीची केंद्रीय इमारत संशोधन संस्था, पुण्याची भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्था, तसंच आयआयटी इंदोर या संस्थांमधल्या तंज्ञांचा या समितीत समावेश असेल. संकटाच्या काळात केंद्र सरकार हिमाचल प्रदेशाच्या पाठीशी ठामपणे उभं राहील, अशी ग्वाही शहा यांनी दिली असून आपत्ती पुनर्वसन कामासाठी २ हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याचं पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या घरात रोकड सापडल्याच्या प्रकरणानंतर, त्यांना पदावरून हटवण्यासाठीच्या महाभियोग प्रस्तावावर सर्व राजकीय पक्षांनी स्वाक्षरी करणं आवश्यक असल्याचं, केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी

एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत म्हटलं आहे. याबाबत आपण समन्वय साधत असून, विविध राजकीय पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांशी बोलणं केलं असल्याचंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

सद्यस्थितीत दहा लाख चौरस किलोमीटर इतका सागरी प्रदेश तेल इंधनाच्या खाणींच्या शोधासाठी खुला केला असल्याची माहिती केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी समाजमाध्यमांवरून दिली आहे. याबरोबरीनंच ९९ टक्के नो-गो क्षेत्र देखील अशा शोधासाठी खुलं केलं असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. उद्योजक आणि उद्योग क्षेत्रातल्या दिग्गजांनी भारतातील तेल इंधन आणि वायू इंधन उत्खनन क्षेत्रातील संधी चाचपडून पाहण्यासाठी हा उत्तम काळ असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. अशा प्रत्येक उपाययोजनांमधून भारत तेल इंधन क्षेत्रातील आत्मनिर्भरतेच्या बाबतीत आत्मविश्वासानं आणि टप्प्याटप्प्यानं वाटचाल करत असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

भारतीय औषध संशोधन परिषद आणि राष्ट्रीय प्रतिकारशक्तीशास्त्र संस्थेचे शास्त्रज्ञ संयुक्तपणे मलेरिया प्रतिबंधक लस विकसित करत आहेत. या लशीचे नाव ॲडफॅल्सीवॅक्स असं असून सध्या तिच्या चाचणीदरम्यानचे निकाल आशादायक असून लवकरच ती सार्वत्रिक वापरासाठी उपलब्ध होऊ शकेल. 'मेक इन इंडिया' अंतर्गत संपूर्ण स्वदेशी संशोधनानं विकसित झालेल्या या लसीमुळे मलेरियाचा प्रसार कमी होईल, तसंच मलेरिया निर्मूलनाला हातभार लागेल.

<><><><><>

गेल्या दशकभरात भारतातली सुमारे २४ कोटी जनता सर्व प्रकारच्या गरिबीतून बाहेर पडली असून त्याच काळात सामाजिक सुरक्षा योजनांचा आवाका दुपटीहून अधिक वाढला असल्याचं नीती आयोगाचे अध्यक्ष सुमन बेरी यांनी म्हटलं

आहे. अमेरिकेत न्यूयॉर्क इथं संयुक्त राष्ट्रसंघाच्या मुख्यालयात आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात ते बोलत होते. देशाने शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये केलेल्या प्रगतीच्या मुळाशी सामाजिक सुरक्षा छत्र आणि विकासाभिमुख सुधारणा असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

अहमदाबाद विमान अपघाताच्या पार्श्वभूमीवर विमान अपघात तपास विभागाच्या प्राथमिक अहवालावरून कोणताही निष्कर्ष काढणं योग्य नाही, असं मत केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री के. राम मोहन नायडू यांनी व्यक्त केलं. गाझियाबाद इथल्या हिंडन विमानतळावरून देशातल्या १० प्रमुख शहरांसाठी थेट विमान सेवा आजपासून सुरू झाली. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या शहरांमध्ये बंगरुळू, कोलकता, वाराणसी, इंदूर, चेन्नई, अहमदाबाद, पटणा, गोवा आणि मुंबई यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

वाढत्या भूराजकीय संघर्षाच्या पार्श्वभूमीवर रशियाबरोबर शांती चर्चा नव्याने सुरु करण्याचा प्रस्ताव युक्रेनने ठेवला आहे. युक्रेनचे नवनियुक्त राष्ट्रीय सुरक्षा आणि संरक्षण मंत्री रुस्तुम उमरोव्ह यांनी हा प्रस्ताव रशियाकडे मांडला आहे. त्याला रशियाचे उप परराष्ट्रमंत्री सर्जी रियाबकोव्ह यांनी सकारात्मक प्रतिसाद देत म्हटलंय की, चर्चेद्वारे प्रश्न सोडवण्याचीच रशियाची भूमिका आहे.

रशियानं काल युक्रेनच्या लष्करी औद्योगिक ठाण्यांवर भेदक क्षेपणास्त्र हल्ले केले. त्यात एकाचा मृत्यू झाला तर ६ जण गंभीररीत्या जखमी झाले. अमेरिकेने कडक व्यापारी निर्बंध घालण्याची धमकी देत सुचवलेल्या ५० दिवसांच्या युद्धबंदीचा प्रस्तावही रशियानं मोडीत काढल्यानंतर युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी शांति चर्चेचा प्रस्ताव मांडला आहे.

**<><><><><>**

सौदी अरेबियाचे राजपुत्र अल वालिद यांचं आज निधन झालं. ते ३६ वर्षांचे होते. निद्रिस्त राजपुत्र म्हणून ते ओळखले जात होते. २००५ साली लंडनमधे एका मोटार अपघातात गंभीररीत्या जखमी होऊन गेली २१ वर्षं कोमात होते. रियाधच्या इमाम तुर्की बिन अब्दुल्ला मशिदीच्या आवारत त्यांचा दफनविधी होणार आहे.

<><><><><>

रशियाच्या कामचातका द्वीपकल्पाच्या आसपासच्या समुद्रात आज पाच वेळा भूकंपाचे धक्के बसल्याचं अमेरिकेच्या खगोलशास्त्रीय सर्वेक्षण केंद्राने म्हटलं आहे. सगळ्यात मोठ्या भूकंपाची तीव्रता रिक्टर स्केलवर ७ पूर्णांक ४ दशांश इतकी होती. या भूकंपानंतर त्सुनामीचा कोणताही धोका नसल्याचं प्रशांत त्सुनामी सूचना केंद्रानं म्हटलं आहे.

<><><><><>

जगभरात आज 'बुद्धिबळ दिन' साजरा होत आहे. याच दिवशी १९२४ साली जागतिक बुद्धिबळ महासंघाची स्थापना झाली होती. बुद्धिबळाच्या खेळाचा वापर समावेशकता, प्रशिक्षण, सक्षमीकरण आणि मानसिक स्वास्थ्यासाठी व्हावा या हेतूने महासंघाने हे वर्ष 'सामाजिक भानासाठी बुद्धिबळ वर्ष' म्हणून घोषित केलं असून या वर्षीचा विषय 'प्रत्येक चाल महत्वाची' असा आहे.

//<><><><><>//